लक्षवेध

**शेतकरी- युवा पिढीला आत्मनिर्भर करण्यासाठी 'यात्रे'तून 'संकल्पसिद्धी'कडे**

# मराठवाड्यातील कृषिक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी भूमिपुत्रांचा पुढाकार




**दिलीपराव देशमुख बारडकर**
(मो.नं. ९८८१४९७०९२)
उपाध्यक्षः महाराष्ट्र ऑरगॅनिक फार्मिंग फेडरेशन, पुणे


**मराठवाडा जनविकास संघाच्या माध्यमातून, येथील भूमिपुत्रांनी प्रामुख्याने या प्रदेशातील कृषिक्षेत्राला स्वयंपूर्ण आणि उन्नत करण्यासाठी, अलिकडेच 'पवित्र माती कलश संवाद यात्रा' आयोजिली होती. सेंद्रिय- विषमुक्त कृषितंत्र आणि निविष्ठा केंद्रस्थानी ठेवून, शेतकरी तसेच युवा पिढीला आत्मनिर्भर करण्याचा हेतू या आयोजनामागे होता. या संदर्भातील मागण्या त्याचप्रमाणे कृषिहिताच्या विविध प्रस्तावांवर एक दृष्टिक्षेप.**

अलिकडेच दि. १२ ते २३ जानेवारी २०२३ दरम्यान मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्याचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांचे जन्मस्थळ ते समाधिस्थळ अशी 'पवित्र माती कलश संवाद यात्रा' आयोजिण्यात आली होती. मराठवाड्याशी नाळ जोडलेल्या पुणेस्थित ४८ सामाजिक स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, उद्योगपती व अधिकाऱ्यांसह श्री. नितीन चिलवंत यांनी समन्वयपूर्वक या यात्रेचे नियोजन केले होते.

महाराष्ट्रात विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र व खान्देशच्या तुलनेत मराठवाडा अधिक मागासलेला आहे. या बाबीकडे केंद्र, राज्य शासन व मराठवाडा विकासप्रेमी उद्योगपतींचे लक्ष वेधण्यासाठी ही संवादयात्रा आयोजित केली होती. मराठवाड्यात जन्मलेल्या व व्यवसाय/ नोकरीनिमित्त पुण्यात, महाराष्ट्रात व परदेशांत स्थायिक झालेल्या व्यक्ती व संघटनांनी 'राज्यस्तरीय मराठवाडा विकास फेडरेशन' स्थापण्याचे ठरले. या व्यासपीठाने केंद्र व राज्य शासनाच्या मदतीने तसेच लोकसहभाग घेऊन मराठवाड्यातील ८ जिल्हे, ७६ तालुक्यांतील सुमारे १ कोटी ५६ लाख लोकांचा सामाजिक, कौटुंबिक, औद्योगिक, आर्थिक, कृषी, पर्यावरणीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक, पायाभूत सुविधा, आरोग्यविषयक इत्यादी सर्वांगीण विकास करण्यासाठी विविध योजना/ प्रकल्पांची मागणी करण्याचे निश्चित करण्यात आले.

मराठवाडा जनविकास संघ, पिंपळे गुरव- पुणे, महाराष्ट्रतर्फे **मराठवाड्याच्या 'कृषीविषयक विकासासाठी'** पहिल्या टप्प्यात खालील प्रकल्प/ उपक्रम हाती घेण्याची शिफारस करण्यात येत आहे. या संदर्भातील मागण्यांचा तपशील खालीलप्रमाणे सांगता येईल.

### विजय केळकर समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी

मराठवाड्यातील शेतीचा अभ्यास करून विजय केळकर समितीने डिसेंबर २०१४ मध्ये महाराष्ट्र शासनाला महत्त्वाच्या शिफारशी केल्या होत्या. समितीच्या अहवालानुसार मराठवाड्याच्या सुमारे

१ कोटी ५६ लाख लोकांपैकी ७३% लोक ग्रामीण भागात शेती करतात. कमी पर्जन्यमान, आधुनिक तंत्रज्ञानाचा तुटवडा आणि प्रक्रिया उद्योगांचा अभाव ही मराठवाड्यातील शेतीच्या दुर्दशेची प्रमुख कारणे आहेत. समितीच्या खालील शिफारशींची शासनाने अंमलबजावणी करावी, असा ठराव करण्यात आला.

१. भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या धर्तीवर औरंगाबाद येथे मराठवाडा कृषी संशोधन परिषद स्थापन करावी व त्यासाठी रु. ५०० कोटींचे अनुदान द्यावे.

अवर्षणग्रस्त भागात कोरडवाहू फळझाडे शेतकऱ्यांसाठी वरदान ठरू शकतील. जांभूळ, सीताफळ, कवठ, चिंच, बोर, करवंद इत्यादी फळझाडांसाठी मराठवाड्यातील हवामान अनुकूल आहे. मराठवाड्याच्या आठ जिल्ह्यांत प्रक्रिया उद्योग सुरू झाल्यास मूल्यसंवर्धन करता येईल.

### २. शाश्वत/ सेंद्रिय शेती महाविद्यालयाची स्थापना (४ जिल्ह्यांत)

विद्यमान महाराष्ट्र सरकारने डिसेंबर २०२२ मध्ये औरंगाबाद येथे देशातील पहिले स्वतंत्र महिला कृषी महाविद्यालय उभारण्याची घोषणा केली आहे, त्याबद्दल शासनाचे अभिनंदन! आधुनिक तंत्रज्ञान ही यशाची गुरुकिल्ली असते. बदलत्या हवामान व परिस्थितीमुळे संपूर्ण जगातील देशांनी विषमुक्त शाश्वत (सेंद्रिय) शेती पद्धती स्वीकारणे सुरू केले आहे. जगातील शाश्वत शेती करणारा पहिला स्वतंत्र देश म्हणून 'इस्टोनिया' देशाची ओळख आहे. ऑस्ट्रेलियात सर्वाधिक शेती विषमुक्त सेंद्रिय शेती करणारे शेतकरी आहेत. त्याखालोखाल अर्जेंटिना व उरुग्वे देशांचा नंबर लागतो. आपल्या पंतप्रधानांनीही सेंद्रिय शेतीचा पुरस्कार केला आहे. भारतात सिक्कीम १००% सेंद्रिय राज्य म्हणून प्रसिद्ध आहे.

देशातील एकमेव सेंद्रिय कृषी विद्यापीठ 'गुजरात नॅचरल फार्मिंग अँड ऑरगॅनिक युनिव्हर्सिटी फॉर एज्युकेशन, रिसर्च अँड एक्स्टेंशन' आणंद, गुजरात राज्यात आहे व याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील ४ जिल्ह्यांत शाश्वत/ सेंद्रिय शेती महाविद्यालयांची स्थापना करण्यात यावी. या ठिकाणी विषमुक्त एकात्मिक शाश्वत/ सेंद्रिय शेती पद्धतींचे तंत्रज्ञान, शिक्षण, संशोधन, प्रचार करण्याचे अधिकृत प्रभावी कार्य करता येईल. प्रस्तावित शासकीय अथवा अनुदानित महाविद्यालयाच्या मदतीने शेतकऱ्यांना कमी खर्चाची, विनाकर्जाची, विषमुक्त तसेच शाश्वत उत्पन्न देणाऱ्या पिकांची लागवड पद्धती 'ईसाप' (ISAP-Integrated Sustainable Agriculture Practices) शेती पद्धतींचा अवलंब करणे सुलभ होईल व त्यांच्यावर आत्महत्या करण्याची पाळी येणार नाही.

### ३. 'सेंटर ऑफ एक्सेलन्स इन बायोडायनॅमिक फार्मिंग' उभारणे (२ जिल्ह्यांत)

डॉ. सर्वदमन पटेल यांच्या भाईकाका कृषी केंद्र, आणंद (गुजरात) येथील ४० एकरांवर गेल्या २० वर्षांपासून 'सेंटर ऑफ एक्सलन्स इन बायोडायनॅमिक फार्मिंग' उभारण्यात आले आहे. जगातील सुमारे ७० देशांतील शेतकऱ्यांनी गेल्या २० वर्षांपासून बायो डायनॅमिक शेती पद्धती अवलंबून उत्कृष्ट प्रतीचे भरघोस उत्पादन मिळविले आहे. वरील केंद्रावर दरवर्षी डिसेंबर महिन्यात जगभरातील शेतकरी, संशोधक, विद्यार्थी, शासकीय अधिकारी ऑनलाईन नोंदणी करून आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण घेतात. मराठवाड्यात या पद्धतीचे सेंटर २ जिल्ह्यांत स्थापन केल्यास मराठवाड्यातील शेतकरी त्याचा लाभ घेतील. मराठवाडा जनविकास संघ यासाठी सर्व तांत्रिक माहिती देण्यास तयार आहे.

### ४. आत्मनिर्भर शाश्वत/ सेंद्रिय गाव निर्मिती प्रकल्प (एक प्रतिजिल्हा)

(Self- Sustainable Biovillage Project)

रासायनिक शेती परवडत नाही, विषारी रसायनांमुळे आपली शेतजमीन व कुटुंबाचे आरोग्यही धोक्यात येत आहे, असा विचार करून अनेक शेतकरी शाश्वत/ सेंद्रिय शेती करायला लागले आहेत. 'Seeing is

believing' या उक्तीप्रमाणे शेतकरी स्वतःच्या डोळ्याने जोवर सेंद्रिय शेती पाहत नाही तोवर त्याचा त्यावर विश्वास बसत नाही. यासाठी एखादे कमी लोकसंख्या असणारे इच्छुक गाव निवडावे व तेथे पहिल्या फेजमध्ये बेसलाईन सर्व्हे करावा व त्यानंतरच्या पाच वर्षांच्या कालबद्ध कार्यक्रमानुसार तेथील १०० टक्के शेती सेंद्रिय/ बायोडायनॅमिक पद्धतीखाली आणावी, शेतमाल प्रक्रिया उद्योग उभारावेत, युवक- युवतींना सेंद्रिय निविष्ठांचे उत्पादन करण्याचे काम द्यावे. वॉटरशेड, विहीर, बोअरवेलचे पुनर्भरण, शेततळे इत्यादी शेतीविकासाची कामे करताना त्या गावाचा शैक्षणिक, आर्थिक इत्यादी विषयक सर्वांगीण विकास घडवावा व केंद्र व राज्य शासन, अनुभवी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली इतरांसाठी 'मॉडेल गाव' म्हणून त्याची उभारणी करण्यात यावी. मराठवाड्याच्या प्रत्येक जिल्ह्यात कमीत कमी एक गाव आत्मनिर्भर सेंद्रिय/ शाश्वत गाव तयार करावे.

### ५. बियाणे बँक निर्मिती (४ जिल्ह्यांत)

हरितक्रांतीची सुरुवात संकरित बियाणे वापरण्यापासून झाली. संकरित किंवा बीटी वाण खताशिवाय वाढत नाहीत, त्यावर भरपूर कीड व रोग येतात व ते फवारण्यांशिवाय नियंत्रणात येत नाहीत. याशिवाय संकरित व संशोधित वाणांच्या उत्पादनाला चव नाही, त्यात पौष्टिक मूलद्रव्ये कमी असतात. आकाराने माल मोठा व आकर्षक दिसतो पण तो बेचव, निकृष्ट दर्जाच असतो. दूरवरच्या वाहतुकीसाठी त्याचा टिकाऊपणा (Shelf life) कमी असतो. याउलट सर्व पिकांचे सरळ, सुधारित व संमिश्र वाण महाराष्ट्रात उपलब्ध आहेत. त्यांना रसायनिक खतांना पर्यायी खत वापरता येते. कीडरोगांचा प्रतिकार करू शकतात, त्यांची चव उत्कृष्ट
असते व त्यात पोषकद्रव्ये भरपूर असतात. हे वाण एकात्मिक शाश्वत शेती पद्धतीला (ISAP-Integrated Sustainable Agricultureal Practices) जास्त प्रतिसाद देतात.

दुर्दैवाने शतेकऱ्यांना यांची माहिती कृषी विद्यापीठे व कृषी विभागांकडून देण्यात येत नाही व ही बियाणे उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना संकरित किंवा संशोधित (खासगी कंपन्यांचे) बियाणे विकत घ्यावे लागते. त्यासाठी मराठवाड्यातील किमान ४ जिल्ह्यांत सर्व पिकांच्या देशी, पारंपरिक, सरळ, सुधारित वाणांचे संकलन, संवर्धन, गुणन व वाटप करण्याची सोय होण्यासाठी बियाणे बँक निर्मिती करण्यात यावी. बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरेंचा आदर्श याबाबतीत घेता येईल.

### ६. युवक- युवतींसाठी स्वयंरोजगार निर्माण करणे

१) मराठवाड्यात इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चरल रिसर्च (ICAR) नवी दिल्लीने अर्थपुरवठा करून १३ कृषी विज्ञान केंद्रांना परवानगी दिली आहे. या कृषी विज्ञान केंद्रांत १ वर्ष कालावधीचा सेंद्रिय शेती पदविका अभ्यासक्रम (Diploma Couse in Organic Farming) सुरू केला तर
मराठवाड्यातील युवक- युवती पदविका प्राप्त करून निविष्ठा उत्पादक कंपन्या, मोठे शेतकरी, उद्योजक, प्रक्रिया प्रकल्प, शेतकरी उत्पादक कंपनी, शासकीय निमशासकीय ठिकाणी रोजगार मिळवू शकतील.

२) पदविकाधारक युवक- युवती शासन योजना व बँकेचे अर्थसहाय्य घेऊन स्वतः सेंद्रिय निविष्ठा उत्पादन व विक्री करून स्वावलंबी होऊ शकतात. डॉ. संतोष चव्हाण यांनी अशा अनेक इच्छुक युवक- युवतींना, शेतकरी गटाला 'बांधावरची प्रयोगशाळा' उभारण्यास मदत करून स्वतःच्या पायांवर उभे केले आहे. प्रस्तावित सर्व उपक्रम केंद्र व राज्य शासन, उद्योजक, तज्ज्ञ मंडळी, स्वयंसेवी सामाजिक संस्था व इतर सर्वांच्या सहकार्याने, मदतीने, लोकसहभागाने पूर्ण करणे अवघड नाही. त्यासाठी फक्त सर्वांची इच्छाशक्ती व संपूर्ण सहकार्य हवे. सुदैवाने महाराष्ट्र शासनाच्या कृषी आयुक्त पदावर श्री. सुनील चव्हाण यांची नोव्हें. २०२२ मध्ये नियुक्ती झाली आहे व ते स्वतः मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील असल्याने त्यांचे सक्रिय सहकार्य मिळेल, असा विश्वास वाटतो. ■